# पुणे महानगरपालिका

**स्थायी समिती विशेष खास (अंदाजपत्रक)**
**कार्यपत्रिका क्र. ४६, दि. २५/०१/२०१६**
**सभा क्र.७७,दि. ३/०२/२०१६ चा वृत्तांत**

नगरसचिव
विषय क्र. २१६३
ठराव क्र. -- ते --

स्थायी समितीची विशेष (खास) तहकूब सभा बुधवार, दिनांक ३/०२/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. सौ. कदम अश्विनी नितीन – अध्यक्षा
२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत | १०. | मा. सौ. टिळक मुक्ता शैलेश |
| ४. | मा.सौ.ओरसे शारदा शंकर | ११. | मा. तुपेरे राहूल बापू |
| ५. | मा. कर्णे(गुरूजी) बापूराव गंगाराम | १२. | मा. बागवे अविनाश रमेश |
| ६. | मा.ॲड्. कदम रामचंद्र उर्फ चंदुशेठ आत्माराम | १३. | मा. सौ. बाबर आरती साईनाथ |
| ७. | मा. केमसे शंकर दत्तात्रय | १४. | मा. राणे अनिल बाबूराव |
| ८. | मा.सौ.ओसवाल दिपाली प्रमोद | १५. | मा. सौ. लोणकर नंदा नारायण |
| ९. | मा. जगताप बाळा उर्फ श्रीकांत शशिकांत | १६. | मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत |

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा. | मा. | मा. | मा. |
| मा. | मा. | मा. | मा. |

लघुलेखक :-

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त | २६. | मा.शिवाजी दौंडकर मुख्य कामगार अधिकारी |
| २. | मा. , अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.) | २७. | मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी |
| ३. | मा. ओमप्रकाश बकोरिया,अति. महा. आयुक्त (वि.) | २८. | मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२) |
| ४. | मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ) | २९. | मा.सुनिल केसरी, उप आयुक्त (प.मं.क्र.१) |
| ५. | मा.डॉ.प्रवीण आष्टीकर, सह. व्यव. संचालक,पीएमपीएमएल | ३०. | मा.ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त (प.मं.क्र.२) |
| ६. | मा.राजेंद्र शेवाळे, उपनगरसचिव | ३१. | मा.मधुकांत गरड, उप आयुक्त (प.मं.क्र.३) |
| ७. | मा.हनुमंत नाझीरकर, प्र.मुख्य समाज विकास अधिकारी | ३२. | मा.सुरेश जगताप, उप आयुक्त (प.मं.क्र.४) |
| ८. | मा.अंबरिष गालिंदे,सह महा. आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) | ३३. | मा.सुरेश जगताप, उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) |
| ९. | मा. सुहास मापारी,उपायुक्त (कआ. व कसं.) | ३४. | मा.सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (भु.जि.) |
| १०. | मा.अनिल पवार, उपायुक्त (विशेष) | ३५. | मा.प्रमोद निरभवणे, अति.नगर अभियंता (पथ) |
| ११. | मा.नितिन उदास, उप आयुक्त (झोनिपु.) | ३६. | मा.श्रीनिवास कंदूल, अधि. अभि.(विद्युत) |
| १२. | मा. प्रकाश बोरसे,उप आयुक्त (जिं.घ.) | ३७. | मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत) |
| १३. | मा.मंगेश जोशी, उप आयुक्त (सामान्य प्रशासन) | ३८. | मा.ना.न.बारापात्रे, अधि. अभियंता, (पथ) |
| १४. | मा.विजय दहीभाते, उप आयुक्त (तांत्रिक) | ३९. | मा.संदीप खांदवे, कार्यकारी अभियंता(भवन) |
| १५. | मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्य अधिकारी | ४०. | मा.व्ही.कुलकर्णी,अधी.अभि.(पा.पु.प्रकल्प,सुअरेज ऑपरेशन) |
| १६. | मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी | ४१. | मा.मदन आढारी, अधीक्षक अभियंता (पाणीपुरवठा) |
| १७. | मा. विलास कानडे, उपायुक्त, स्थानिक संस्था कर | ४२. | मा.अब्बास पटेल, अधीक्षक अभियंता (पाणीपुरवठा) |
| १८. | मा.प्रशांत वाघमारे, शहर अभियंता | ४३. | मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी |
| १९. | मा.राजेंद्र राऊत प्र.अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ ) | ४४. | मा.डॉ.टेकाळे, विशेष कार्याधिकारी (दक्षता) |
| २०. | मा. सौ. मिनाक्षी राऊत,शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि. | ४५. | मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो) |
| २१. | मा.बबन दहिफळे, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ | ४६. | मा. माधव जगताप, उपायुक्त, अतिक्रमण व वि. कार्या.भूसंपादन |
| २२. | मा.ॲड.मंजूषा इधाटे, प्र.विधी अधिकारी | ४७. | मा. राहूल जगताप, सांख्यिकी व संगणकप्रमुख |
| २३. | मा.रमेश शेलार, मुख्य सुरक्षाअधिकारी | ४८. | मा. गणेश सोनुने, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी |
| २४. | मा.घोरपडे, मुख्य उद्यान अधिक्षक | ४९. | मा.शाम ढवळे, कार्य.अभि.(हरिटेज सेल) |
| २५. | मा.मंगेश जोशी, उप आयुक्त (समाजकल्याण) | ५०. | मा.प्रविण गेडाम,कार्य.अभि.(पा.पु.) |

सोबतची तहकुबी घेणे.

# पुणे महानगरपालिका

**स्थायी समिती विशेष खास (अंदाजपत्रक)**
**कार्यपत्रिका क्र.४६, दि. २५/०१/२०१६**
**सभा क्र.७७,दि.३/०२/२०१६ चा वृत्तांत**

**विषय क्र.२१६३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९५ नुसार सन २०१५–२०१६ चे महसूली, भांडवली इ. उत्पन्न व खर्चाचे ('अ' व 'क') अंदाजपत्रकाचा आराखडा सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/९८६ दि. २०/०१/२०१६ चे पत्र

मा.अध्यक्षा – यामध्ये सेवकवर्गाचा तक्ता दिलेला नाही.

मा.अविनाश बागवे – दरवर्षी आपल्याला सेवकवर्गाचा तक्ता ठेवावाच लागतो. मागच्या प्रत्येक बजेटच्या वेळेस खात्याचे नवीन पदे वाढविली किंवा वाढविली नाही तरीही सेवकवर्ग तक्ता यायचाच आणि आता जर शासनाने आपल्याला जवळपास २००–३०० पदे वाढवून दिलेली आहेत आणि आपल्याला तशी भरती करावी लागणार असेल तर आपल्याला तशी तरतूद करावी लागेल. त्यामुळे तो सेवकवर्गाचा तुमचा तक्ता त्यामध्ये यायला पाहिजे होता, पहिल्याच दिवशी आम्ही तक्ता द्या असे सांगितले होते त्यावेळी मा.बकोरिया साहेब तक्ता द्यायला सांगतो असे म्हणाले होते.

मा. बापूराव कर्णे गुरूजी – म्हणजे आपण त्यामध्ये तरतूद टाकतो.

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त (सामान्य प्रशासन)– आपल्याकडे सेवकवर्गाकडे ज्यावेळी पदनिर्मिती करायची असते त्यावेळी आपण तो प्रस्ताव देत असतो.

मा.अविनाश बागवे–तुम्हांला शासनाने आता पदांना मान्यता दिली आहे मग ते तुम्ही कसे घेणार, त्यांचे पैसे कुठे पकडणार, म्हणजे जर तुम्ही बजेटमध्ये तरतूदच करणार नसाल तर त्यांना तुम्ही पगार कोठून देणार?

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त(सामान्य प्रशासन)– तरतूद आम्ही करत नाही, ज्या खात्याला माणूस हवा आहे ते–ते खाते तरतूद करत असते. ज्या खात्यांना आकृतीबंधामध्ये जागा मंजूर झाल्या आहेत त्याप्रमाणे त्यांनी तरतूद करायला हवी.

मा. अविनाश बागवे – आपल्या प्रत्येक बजेटच्या वेळी तो सेवकवर्गाचा तक्ता देतात जर जागा निर्माण केली नसेल तर झीरोचा उल्लेख केला जातो.

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त(सामान्य प्रशासन)– तक्ता असतो, पण पोस्ट क्रिएट केली असेल तर देतात.

मा. अविनाश बागवे – पोस्ट क्रिएट केली नाही तरी तो माहितीसाठी देतात.

मा. बापूराव कर्णे गुरूजी – जरी पोस्ट क्रिएट केली नसेल तरी शुन्य आकडा तक्त्यात देतात.

मा.अविनाश बागवे – आम्ही मागील ७–८ वर्षापासून बघतो आहे दरवर्षी तक्ता देतात. गेल्यावर्षी प्रमाणेच तक्ता असेल तरी जसा आहे तसा तक्ता देतात, पण देतात.

मा.सौ.मुक्ता टिळक–आपण जर नवीन पदे निर्माण केली, ती पदे निर्माण केल्यानंतर त्यांना आपण पगार कोठून देणार?

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त(सामान्य प्रशासन)– पगाराची तरतूद झाली आहे.

मा.सौ. मुक्ता टिळक – ती तरतूद तुम्ही आम्हांला महागाई भत्ता, वेतन आयोग यासाठी झाली आहे असे सांगितले.

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त(सामान्य प्रशासन)– ज्या खात्याला पदनिर्मिती झाली म्हणजे उदाहरणार्थ दक्षता विभाग कारण पूर्वी आपल्याकडे दक्षताचे खाते नव्हते, घनकचरा खाते नव्हते त्यामुळे त्यांनी गेल्याच वेळी बजेट प्रोव्हिजन करून घेतली आहे.

मा.अविनाश बागवे – त्यांनी प्रोव्हिजन केली पण आपण भरती केली नाही तर मग ते वेतनामधील पैसे कट करायचे का?

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–त्या पदावर काम करणारा एक्झिस्टींग स्टाफ त्यांच्याकडे आहे.

मा.अविनाश बागवे–तुम्ही सेवकवर्ग तक्ता दिला पाहिजे कारण आम्हांला समजले पाहिजे की तुम्ही किती ज्यादा सेवकांचे वेतन धरले आहेत, तसे केले नाही आणि यावर्षी खात्याने भरती केली नाही तर ते पैसेही कट करायचे का? त्यामुळे आता सद्यस्थितीत किती सेवक आहेत त्याचा तक्ता आम्हांला द्या.

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–मा.अध्यक्ष, आपण दरवर्षी सेवकवर्ग तक्ता पाठवतो ते बरोबर आहे त्याप्रमाणे आपण एकूण पदांची जी निर्मिती करतो ते आकडे वाचून दाखवतो. आपण २००८–०९ ला सेवकवर्ग तक्ता पाठविला होता आणि २८३ नवीन पदांची निर्मिती करण्यासाठी मागणी केली होती, त्यामध्ये वर्ग १ ते ४ ची पदे आहेत. २०१०–११ ला आपण १०१४ पदे मागितली होती आणि सन २०११–१२ ला २६०६ पदे मागितली होती म्हणजे सर्वात जास्त पदे आपण २०११–१२ ला मागितली होती. त्यानंतर २०१२–१३ ला ४०४ पदे मागितली होती, २०१४–१५ ला ६०१ पदे मागितली होती आणि मागच्या बजेटमध्ये आपण एकही नवीन पद निर्मित केले नव्हते. त्यामुळे मागील या ४–५ वर्षात एकूण ४९०८ पदांची आपण निर्मिती केली होती, ही सर्व पदे शासनाने आपल्याला एकदमच मंजूर केली. इतके दिवस शासन मान्य करत नव्हते कारण त्यांनी सांगितले की जोपर्यंत तुमचे रिक्रूटमेंट रूल येत नाहीत तोपर्यंत आम्ही तुमच्या कोणत्याही पदाला मान्यता देणार नाही. त्यामुळे हे सर्व फेरफार तक्ते आपण जी.बी.कडून मान्य करून

शासनाकडे पाठवायचो आणि शासन त्याला मान्यता द्यायचे, ते पाच वर्षाचे त्यांनी पेंडींग साठवून ठेवले आणि त्या सर्वाला आपल्याला एकत्रित मान्यता दिली. त्यामुळे आपल्याकडे गेल्यावर्षी आणि यंदा एकही पदनिर्मिती झाली नाही. मी तपशील देतो पण फेरफार तक्ते जे प्रत्येक बजेटला आपण जी.बी. कडे जातो ते यामध्ये येणार नाहीत.
उपनगरसचिव–माझ्याकडे उपसूचना आली आहे.

## उपसूचना

**सूचक**–मा.शंकर केमसे,सभागृहनेते

**अनुमोदक**–मा.बापूराव कर्णे गुरूजी,मा.सौ.आंदेकर,मा.सौ.शारदा ओरसे, मा.ॲड.चंदूशेठ कदम,मा.सौ.दिपाली ओसवाल,मा.श्रीकांत जगताप, मा.सौ.मुक्ता टिळक,मा.राहूल तुपेरे, मा.अविनाश बागवे, मा.सौ.आरती बाबर, मा.अनिल राणे, मा.सौ.नंदा लोणकर, मा.राजेंद्र शिळीमकर

सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक 'अ' व 'क' मधील जमा व खर्च बाजूकडील रकमा कमी अधिक करण्याचे तसेच अंदाजपत्रकामध्ये फेरफार, दुरूस्ती व नविन विकास कामांचा समावेश, आर्थिक तरतूदी समाविष्ट करण्याचे व इतर दुरूस्तीचे व सेवकवर्ग फेरफार तक्त्यामध्ये दुरूस्तीचे, जागा कमी अधिक करणेचे, नवीन जागा निर्माण करणे इ.बाबींचे सर्व अधिकार मा.सौ.अश्विनी कदम, अध्यक्षा, स्थायी समिती यांना देण्यात येत आहे.
उपनगरसचिव–या उपसूचनेला कोणाचा विरोध आहे का?
मा.अविनाश बागवे–ही उपसूचना मान्य करावी.
**निर्णय**–सदर विषयाबाबत सर्वानुमते, मा.अध्यक्षांना अधिकार देण्यात आले.
मा. अध्यक्षा– सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक अ व क मधील जमा व खर्च बाजूकडील रकमा कमी अधिक करण्याचे तसेच अंदाजपत्रकामध्ये फेरफार दुरूस्ती व नवीन विकास कामांचा समावेश, आर्थिक तरतूदी समाविष्ट करण्याचे व इतर दुरूस्तीचे व सेवकवर्ग फेरफार तक्त्यामध्ये दुरूस्तीचे, जागा कमी–अधिक करण्याचे, नवीन जागा निर्माण करणे इत्यादी बाबींचे सर्व अधिकार सन्माननीय स्थायी समितीने अध्यक्ष या नात्याने मला दिलेले आहेत याबद्दल मी सर्व सन्माननीय स्थायी समितीचे आभार मानते आणि आपण जो विश्वास, माझ्या प्रती दाखवत आहात त्याबद्दल देखील मी आपले आभार मानते. धन्यवाद!

अशा पध्दतीने सभेचे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**उपनगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**